जळगाव जिल्हा पोलीस
दिनांक १६/०५/२०२५

-: प्रेस नोट :-

प्रति,

मा.संपादक ,

---

**अंमली पदार्थ विक्री व सेवन करणा-या इसमांवर जळगाव जिल्हा पोलीस दलाकडुन मोठया प्रमाणात केली कारवाई**

मा. पोलीस महासंचालक सो, महाराष्ट्र राज्य यांनी "अंमली पदार्थ विराधी " विशेष मोहीम दिनांक ०१/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ पावेतो राबविणेबाबत राज्य पोलीस आदेशीत केले होते. त्यानुसार मा.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक सो, जळगाव यांनी जळगाव जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ,पोस्टे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम राबविण्याबाबत सुचना केल्या होत्या .दिनांक १५/०५/२०२५ रोजी जळगाव जिल्हयात अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम राबवुन चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत एक इसम गांजा हा अंमली पदार्थ एकुण १० किलो किंमत रुपये २,२०,०००/- रुपयाचा गांजा बाळगताना मिळुन आला. त्यांनतर जळगाव जिल्हयामध्ये मोहीम राबवुन भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन-१४ MIDC पोलीस स्टेशन -५,पारोळा पोलीस स्टेशन-०४,अंमळनेर पोलीस स्टेशन-०३,यावल पोलीस स्टेशन-०३,धरणगाव पोलीस स्टेशन-०५,चाळीसगाव पोलीस स्टेशन-०५,शनीपेठ पोलीस स्टेशन-०५,जळगाव शहर पोलीस स्टेशन-०२,जिल्हापेठ पोलीस स्टेशन-०२,रामानंदनगर पोलीस स्टेशन-०२,चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन ०२,चोपडा शहर पोलीस स्टेशन ०२, अडावद पोलीस स्टेशन ०२,वरणगाव पोलीस स्टेशन ०२,भुसावळ शहर ०२, तसेच भडगाव पोलीस स्टेशन,पाचोरा पोलीस स्टेशन ,चोपडा ग्रामीण व मेहुणबारे पोलीस स्टेशन यांनी प्रत्येकी ०१ अशा गांजा हा अंमली पदार्थ सेवन करणा-या एकुण **६४** इसमांवर कारवाई करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा पोलीस दलाने दिनांक ०१/०५/२०२५ ते आजपावेतो अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम राबवुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

| क्र | घटकाचे नाव | दाखल गुन्ह्यांची संख्या | जप्त माल | | | | | किंमत | अटक आरोपी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकार | किलो | ग्रॅम | मिली | लिटर | | |
| १ | जळगाव जिल्हा | १ | Methaqualon / (MD) | ० | ७७ | १३ | ० | ७४९३०० | ३ |
| | | ०३ | गांजा बाळगणे, वाहतुक | १७ | ३१४ | ० | ० | ३५४१०० | ३ |
| | | ९८ | गांजा सेवन करणे | ० | ११० | ० | ० | २२०० | ९८ |
| | एकुण | १०२ | | १७ | ५०१ | १३ | ० | ११०५६०० | १०४ |

सदरची कारवाई मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्री अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव तसेच मा.श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यापुढे सुध्दा जळगाव जिल्हयांत अशा प्रकारची मोहिम राबविण्यात येणार आहे.

( जनसंपर्क अधिकारी )
जळगाव जिल्हा पोलीस विभाग



Top Cop Of The Month
हार्दिक
अभिनंदन
DIAL
1091







